-: प्रेसनोट दिनांक ०६/०८/२०२२ :-

जॉन वसंत तिवडे, पोलीस नाईक, ब. नं. ९५९, नेम. पोलीस मुख्यालय, कोल्हापूर, रा. कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत.........

---

यातील तकारदार यांचे देहुगांव, ता. हवेली, जि. पुणे येथील शेतीबाबत महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण पुणे खंडपीठ, पुणे येथे तीन दावे चालु होते. त्याचे नंबर पीव्ही ३/२०२१, पीव्ही ४/२०२१ व पीव्ही २/२०२१ असे होते. दरम्यान कालावधीमध्ये एका अनोळखी इसमाने तक्रारदार यांचेशी फोनवरून संपर्क साधुन एका महत्वाचे विषयावर तुमच्याशी बोलायचे आहे, तुम्ही भेटा असे सांगितले. त्याबाबत तकारदार त्या इसमाशी संपर्कात होते, दि. २५/०२/२०२२ रोजी तक्रारदार यांनी कोल्हापूर कलेक्टर ऑफिस येथे येवुन त्या इसमाची भेट घेतली. त्यावेळी तो इसमा पोलीस युनिफॉर्ममध्ये येवुन त्यांना भेटला. त्यावेळी त्या पोलीस कर्मचा-याने वर नमुद दाव्यांचे निकाल संदर्भात तकारदार यांना ' तुमच्या विरूध्द पार्टीने आम्हाला एक कोटीची ऑफर दिली आहे, तुम्ही किती देता ते बोला,' तसेच 'केसचा निकाल तुमच्या बाजुने लावुन देतो, तुम्ही किती रूपये देवु शकता?, समोरच्या पार्टीने एक कोटीची ऑफर दिली आहे' असे म्हणुन लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर विभागाकडे तक्रार केली होती.

तकारदार यांचे तकारीप्रमाणे पडताळणी केली असता, दिनांक २२/०३/२०२२ रोजी कोल्हापूर कलेक्टर ऑफिस येथील पोना तिवडे यांनी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष कोल्हापूर एस टी स्टॅण्ड परिसरातील हॉटेल सुब्राया येथे तकारदार यांचेकडे त्यांचे जमिनीबाबत एमआरटी कौसिल, पुणे येथील दाव्यांचे निकाल तेथील प्रशासकीय सदस्य माने साहेब यांना सांगुन त्यांचेबाजुने लावुन देण्यासाठी तकारदार चव्हाण यांचे विरूध्द पार्टीने एक कोटी रूपयेची ऑफर दिली असुन तकारदार यांना त्यांचे घरच्यांशी चर्चा करून त्यांची किती रक्कम देण्याची तयारी आहे असे म्हणुन लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले आहे.

सदरबाबत फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक जॉन वसंत तिवडे, पोलीस नाईक, ब.नं. ९५९, नेम. पोलीस मुख्यालय, कोल्हापूर, रा. कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द शाहुपूरी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू असुन आरोपीचा शोध चालु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोना विकास माने, सुनिल घोसाळकर, पोकॉ मयुर देसाई, रूपेश माने अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३.

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,

६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner